# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 17.09.2025** **वार- बुधवार**

---

**<u>मोदीवाढदिवस</u>**

शहराची स्वच्छता ही केवळ सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. विद्यार्थी जर घर, शाळा आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्याचा संकल्प करतील, तर देश निश्चितच सशक्त बनेल, अशी भावना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केली आहे. पुण्यामध्ये आज  साडेसात हजार विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचे सामूहिक शपथ घेतली या कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 75 व्या वाढदिवसानिमित्त कसबा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांच्या संकल्पनेतून स्वच्छ सुंदर विकसित कसबा मिशन आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने ७५०० विद्यार्थ्यांनी स्वच्छतेची सामूहिक शपथ घेतली. यावेळी पार पडलेल्या कार्यक्रमास माजी केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हेमंत रासने म्हणाले, "२०४७ साली आपला देश विकसित करण्याचे पंतप्रधान मोदींचे स्वप्न आहे. त्यांना अपेक्षित असलेले स्वच्छ भारत मिशन प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रत्येकाने सहभाग नोंदवला पाहिजे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे अलौकिक व्यक्तिमत्व असून त्यांच्या नेतृत्वाखाली भारत  जागतिक महासत्ता बनेल असं प्रतिपादन भाजपाचे वरिष्ठ नेते माधव भांडारी आणि भाजपाचे पुणे शहर अध्यक्ष धीरज घाटे

यांनी केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने कोथरूडच्या मृत्युंजयेश्वर मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी क्रिएटिव्ह फाउंडेशनच्यावतीने विविध संस्थांना आरोग्य साहित्याचे वाटप करण्यात आले.

**<u>सेवापंधरवडा</u>**

भारतीय जनता पक्षाच्या वतीनं पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान'अंतर्गत सेवा पंधरवड्याचा शुभारंभ कार्यक्रम पुण्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सुरु आहे. तर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या संकल्पनेतून सर परशुराम महाविद्यालयाच्या मैदानावर ड्रोन-लाईट शो या प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आलं आहे.

"स्वस्थ नारी, सशक्त परिवार" या अभियाना अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालये आणि दवाखान्यात विविध आरोग्य शिबिरे, तपासण्या आणि जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

**<u>अनास</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'अर्थसंकल्पात नागरी सहभाग' या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. अर्थसंकल्प २०२६–२७ साठी ५ हजार १०२ नागरिकांचे अभिप्राय प्राप्त झाले आहेत. यामध्ये प्रभाग 'ड' मधून सर्वात जास्त १ हजार १६१ अभिप्राय प्राप्त झाले आहेत.अर्थसंकल्पात नागरी सहभाग उपक्रमांतर्गत नागरिकांनी सुचवलेल्या योजनांसाठी त्यांच्या परिसरात वसूल होणाऱ्या मालमत्ता कराच्या १० टक्के निधीची तरतूद केली जाते.

**<u>परिषद</u>**

समाजवादी आंदोलनाला ९० वर्षे पूर्ण होत आहेत, या निमित्ताने पुण्यात  येत्या १९ ते २१ सप्टेंबर समाजवादी एकजूट परिषदेचे आयोजन करण्यात आलं असल्याची माहिती आज पत्रकार परिषदेत देण्यात आली. सिंहगड रस्त्यावरील राष्ट्र सेवा दलाच्या साने गुरुजी स्मारक इथं ही परिषद होणार आहे. राष्ट्र सेवा दल, एस.एम. जोशी सोशलिस्ट फाऊंडेशन, युसुफ मेहेरअली सेंटर, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि समाजवादी समागम यांनी संयुक्तपणे या परिषदेचं आयोजन केलं आहे.

**<u>ससून</u>**

ससून रुग्णालयात बाह्यरुग्ण विभागाच्या सुविधा एकाच छताखाली मिळाव्यात यासाठी बाह्यरुग्ण विभागाचे नूतनीकरण करण्यात येत आहे.   यामुळे २५ प्रकारच्या बाह्यरुग्ण सेवा  एकाच ठिकाणी मिळण्यास मदत होणार आहे.

**<u>नियुक्ती</u>**

पुणे महापालिकेच्या उपायुक्त पदावर रवी पवार आणि निखिल मोरे या दोघांची, तर सहायक आयुक्तपदी सोमनाथ आढाव यांची  नियुक्ती करण्यात आली आहे.

अटक-चार हजाराहून अधिक ठेवीदारांच्या २ हजार ४ शे ७० कोटी रुपयांची फसवणूक करुन फरारी असलेल्या ज्ञानराधा मल्टीस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटीची संचालक अर्चना सुरेश कुटे हिला राज्य गुन्हे अन्वेषण विभाग अर्थात सीआयडीने  पुण्यातील बाणेर येथून अटक केली आहे. सोसायटीचे अध्यक्ष सुरेश कुटे याला यापूर्वीच अटक केली आहे. या सोसायटीच्या संचालक मंडळ, पदाधिकारी यांच्या विरोधात एकंदर ९५ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज आकाश अंशत: ढगाळ होतं. कमाल तापमान ३० तर किमान तापमान २२ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही याच स्वरूपाचं हवामान राहण्याची शक्यता असून हलक्या पावसाचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये,नमस्कार.**